विकास योजनेमध्ये टेकडी लगतच्या १०० फुट क्षेत्राचा समावेश विकसनक्षम विभागात न करणेबाबत.
महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
शासन निर्णय क्रमांक : टिपीएस-१८१७/अनौसं-९०/१७/नवि-१३
दिनांक :१४ नोव्हेंबर, २०१७.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील तरतूदीनुसार नियोजन प्राधिकरणांच्या कार्यक्षेत्रासाठी विकास योजना तयार करणेत येतात. पुणे जिल्ह्यातील कात्रजघाटातील टेकड्या फोडून होणाऱ्या अनधिकृत बांधकामांच्या अनुषंगाने मा.राष्ट्रीय हरित प्राधिकरण, पुणे यांच्याकडे दाखल ॲप्लिकेशन क्र.४/२०१४ मध्ये मा.न्यायालयाने दि.१९/०५/२०१५ रोजी आदेश पारित करुन डोंगर माथ्यावर तसेच टेकडीच्या उताराच्या खालच्या भागापासून १०० फुट अंतरापर्यंत बांधकामास परवानगी देण्यात येऊ नये अशा सूचना राज्यातील सर्व महानगरपालिका / नगरपालिका यांना देण्यात याव्यात असे आदेश पारीत केलेले आहेत. डोंगरमाथा तसेच डोंगरउतारावरील १:५ पेक्षा तीव्र उताराच्या जमीनीवर कोणताही विकास अनुज्ञेय होत नसल्याबाबत यापुर्वीच विकास नियंत्रण नियमावलीमध्ये तरतूद समाविष्ट आहे. मा. राष्ट्रीय हरीत प्राधिकरण यांचे दि.१९/०५/२०१५ रोजीचे आदेश विचारात घेऊन राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ नुसार पुढीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

## निदेश

१) नियोजन प्राधिकरणांनी त्यांच्या कार्यक्षेत्राकरीता विकास योजना तयार करतांना / सुधारीत करतांना टेकड्यालगतच्या १०० फुट परिसरात विकास झालेला नसल्यास ते क्षेत्र नाविकास विभागात / खुल्या स्वरुपाच्या आरक्षणाकरीता दर्शविणेबाबतची कार्यवाही करावी.
२) टेकड्यांलगतच्या १०० फुट क्षेत्रात यापुर्वीच अधिकृत विकास झाला असल्यास त्यामध्ये वाढीव बांधकामासाठी अतिरिक्त च.क्षे.नि. अथवा टिडीआर अनुज्ञेय करु नये.
३) मंजूर विकास योजनेत टेकडीलगतचे १०० फुट क्षेत्र विकसनक्षम विभागात असल्यास या क्षेत्रासह लगतच्या सलग जमीनीत विकास परवानगी अनुज्ञेय करतेवेळी या १०० फुटामध्ये केवळ Non Buildable वापर जसे खुली जागा, रस्ते इ. अनुज्ञेय करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Pawar
Rajendra
Mahadeo

(रा.म.पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी:-

१) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.

२) मा.राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव.

३) प्रधान सचिव (नवि-१) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

४) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.

/-त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे निदेश नगर रचना संचालनालयाच्या www.dtp.maharashtra.gov.in या वेबसाइटवर देखील प्रसिद्ध करण्यात यावेत. तसेच याच्या प्रती सर्व संबंधितांना पाठवून द्याव्यात.

५) मुख्य नियोजनकार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई.

६) संचालक तथा सह सचिव (नगर रचना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

७) सह संचालक तथा सह सचिव (नगर रचना), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

८) सह संचालक, नगर रचना, अंमलबजावणी कक्ष / मुल्यांकन / पुणे / कोकण / नाशिक /नागपूर / औरंगाबाद / अमरावती विभाग

९) विभागीय आयुक्त, पुणे / कोकण / नाशिक /नागपूर / औरंगाबाद / अमरावती विभाग.

१०) आयुक्त, सर्व महानगरपालिका.

११) जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे.

१२) सर्व महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे.

१३) शहर व औद्योगिक विकास महामंडळ, नवी मुंबई.

१४) सहायक संचालक, नगर रचना / नगर रचनाकार, सर्व शाखा कार्यालये, नगर रचना विभाग.

१५) मुख्याधिकारी, सर्व नगरपालिका/नगर पंचायत.

१६) कक्ष अधिकारी (नवि-२९), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे निदेश विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावेत.

१७) कक्ष अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, सदरचे निदेश शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावेत.

१८) अवर सचिव, नवि-११ / नवि-१३ / नवि-३०.

१९) कक्ष अधिकारी, नवि-९ / नवि-१२.

२०) निवडनस्ती (नवि-१३).